classmate

Date

Page (१)

# "कातरवेळ"

परवाचं सुरेशराव आणि पुष्पाताईंनी नटसम्राट नाटक पाहिलंते. कधीचं बघायचं होतं दोघांनाही, आणि आल्यापासून काय तर त्याबद्दलच एकमेकांशी बोलणं चालत होतं. त्यातील प्रसंगांची उजळणी करतांना त्यांना त्यांच्या संसारातील कित्येक चांगल्या - वाईट सुखद - दुःखद घटनांची आठवण येत होती; आणि त्याबद्दल एकमेकांना ती दोघे कातरवेळी सांगत होती.

त्यांच्यातील संवाद त्यांची सून सुनेत्राला काम करता करता ऐकायला येत होते. तिलाही ऐकायचा हुरूप आला, त्यांच्याजवळ जात ती म्हणाली मलाही तुमच्या आठवणी सांगा ना!! मग काय त्यांना तर उत्तम श्रोताच मिळाला ऐकायला, दोघेही हिरीरीने गत आठवणींबद्दल बोलु लागले; सुनेत्राला एवढं कळलं की, त्यांचं आजपर्यंतचे आयुष्य सुखसमाधानात गेले... काही वेळेस कसोटीचे क्षणही पार करावे लागले. पण दोघांच्या साथीने ते निभावले ही!!

सुनेत्रा पुष्पाताईंना म्हणाली, 'आई जेव्हा पासून मी या घरात आले तेव्हा मनातून थोडी घाबरलेलीच होती. नवीन घर, नवीन लोक, नवीन जीवनमान कसं होणार माझं? पण लवकरच तुमच्या आणि बाबांच्या प्रेमळ सहवासात माझी भीती, चिंता कुठल्या कुठे पळाली, तुम्ही दोघांनीही घराला, घरातील व्यक्तीला प्रेमळ संस्कारांनी बांधून ठेवलं होतं. पै पाहुणेही सतत काही ना काही कारणाने यायचे, तेव्हा सगळ्यांचं तुम्ही हसतमुखाने स्वागत करायच्या. मला पण नोकरीची संधी चालून आल्यावर ती तुमच्याच सहकार्याने सुरु झाली. मग 'सोहमचं' आगमन झालं. त्याच्या कोडकौतुकात तर तुम्हाला स्वर्गसुख मिळत होतं. आजी - आजोबा असं प्रमोशन मिळाल्यामुळे तुम्ही खुष होतात.

समीरला जेव्हा ऑफीसच्या कामाने खर्जासाठी कॅनडाला जावे लागले तेव्हा पुत्रविरहाने तो जावू नये असे वाटले पण त्याच्या करिअरच्या दृष्टीने ते आवश्यक आहे हे ही मनाला पटल्यामुळे तुम्ही त्याला एका डोळ्यात आसू तर दुसऱ्या डोळ्यात हसु अशा मनास्थितीत दिलेला निरोप अजूनही आठवतो; अधून-मधून नातेवाईकांच्या भेटी, मित्रांच्या भेटी, सार्वजनिक उत्सवात असलेला तुमचा

सहभाग सर्वांसच कौतुकास्पद आहे.

पण आई बाबा मला आज लक्षात येतंय की, तुमचा उत्साह तर कायम आहेच पण वार्धक्यामुळे तुमची ताकद थोडी कमी झाली, आणि हे सत्य तुम्ही दोघांनीही मनापासून स्विकारायला हवं. माझ्या बोलण्याचं वाईट वाटून घेवू नका आजवर घराचा डोलारा समर्थपणे सांभाळणाऱ्या आमच्या आईबाबांना आता आरामाची गरज आहे. प्रत्येक गोष्ट मीच करणार, हा हट्ट आता तुम्ही सोडायला हवा. मलाही हे कधीतरी बोलायचंच होतं, तुम्ही न, आता घरातल्या कारभाराची चिंता सोडा. आणि आई, याला हे आवडतं - त्याला ते आवडतं हे लक्षात ठेवून तुम्ही स्वयंपाकघरात जी खटपट करता नं ती आता हळूहळू कमी करा. काय होतं इतक्यात तुमच्या आठवण राहत नाही म्हणून कधी तिखट मीठ जास्त होतं तर कधी टाकायचंच विसरता !! वाण सामानाच्या यादीतही आता बदल करायला हवा. सगळं रेडीमेड तिखट, मसाले, मेतकूट, पापड थोडे थोडे दर महिन्याला आणत जावू भाजी बाजार पण मीच येताजाता आणत जाईन उगीच तुम्हाला कष्ट नको.

आणि बाबा, सोहमचं होमवर्क आता तुम्ही घेत जावू नका. त्याला शिकवणी वर्ग लावला आहे. नेण्याआणण्यासाठी ॲटोरीक्षा पण ठरवला आहे. तुम्हाला उगीचच त्याच्यासाठी अडकून पडायला नको. सुनेत्राचं असं बोलणं सुरूच असतांना समीरही आज रोजच्या पेक्षा जरा लवकर घरी आला, आणि म्हणाला, 'अग, सुनेत्रा उद्या शनिवार - रविवार आपण वीकएंड साठी सोहमला घेवून अलिबागला जाणार आहोत, ऑफीसचे २/३ मित्रपण त्यांच्या फॅमिली सोबत येणार आहेत. चला लवकर लवकर तयारी करून या. सुनेत्रा त्याला मध्येच थांबवत म्हणाली; हो अरे पण मग आई बाबांचं काय ? समीर म्हणाला त्यात काय एवढं ? ते राहतील की दोघं घरीच !! मालतीबाई आहेत सगळं सांभाळायला !! तसेही त्यांच्याच्याने आता जास्त पायी चालणं होत नाही, ऐकलं न आईबाबा तुम्ही; आम्ही येतो २ दिवसात जावून !! सोहमचा क्लास सुटल्यामुळे तो पण घरी आला. ट्रीपला जायचे हे कळल्यावर त्यालाही खूप आनंद झाला. आता तिघांचे मिळून प्लॅन्स तयार होवू लागले.

आई बाबा जागेच आहेत याची दखलही घेतली नाही हे त्यांना थोडं खटकलं, चुपचाप आपाल्या खोलीत निघून गेले. सकाळी लवकरच म्हणजे ५.३० वाजता गाडी स्टार्ट केल्याचा आवाज आल्यामुळे दोघांचीही झोपमोड झाली. 'अरे, गेली वाटतं ही कंपनी', असे म्हणत सुरेशरावांनी खिडकीतून पाहयलं तर काय कार भुर्रकन निघूनही गेली. पुष्पाताईंना वाईट वाटलं, आपल्याला साधं निघतो असंही सांगितलं नाही म्हणून !!

एकदम ऊंच ऊंच झुल्यावरून खाली आपटल्याची जाणीव त्यांना झाली. हे असं काय झालंय आपल्या जीवनात ?? आजपर्यंत आपल्याला माहित नाही अशी एकही गोष्ट घरात घडत नव्हती आणि आज हे काय, एकदमच वाळीत टाकल्यासारखं वाटतंय. एवढी आपली कीमत कमी झाली कां ?? हे असं नवीन प्रकारचं जीवन आपल्याला भोगावं लागणार कां रे देवा ?? शक्ती दे मग तूच आता ..

त्यांची मनस्थिती जाणून सुरेशरावांनी चहा केला. इकडचं-तिकडचं बोलून त्यांना हसतं-खेळतं करण्याचा प्रयत्न केला. संध्याकाळी दोघेजण झोपाळ्यावर बसून या नव्या आव्हानाला तोंड कसं द्यायचं यावर बोलत होते. सुरेशराव म्हणाले, 'पुष्पा, आजूबाजूला बघ - अशा कातरवेळी आपोआपच मन अंतर्मुख होऊन जातं की नाही ?? दिवस संपून यामिनीचे आगमन होण्याची ही वेळ - उगाचच मनाला हुरहुर लावते. आता आपल्याही आयुष्यात ही कातरवेळ डोकावून राहयली. याच्या पुढे आणखीन असे कांही प्रसंग येतील की त्यामुळे तुझं मन दुखावल्या जाईल. तेव्हा आपण दोघांनीही हे स्विकारायला हवं की; आता हळूहळू आपण आपल्या या संसाराच्या व्यापातून मोकळे होवू या. समीर-सुनेत्राच्या हाती कारभार सोपवून शांत मनाने नवीन जीवनाचे वेळापत्रक आखू या. त्यात फक्त तुझा-माझा समावेश असेल. त्रयस्थाच्या भूमिकेतून आता यापुढे या घरात राहयचे. सोहम पण आता त्याच्या मित्रांमध्ये रमला, आपली तेवढी गरज त्याला भासत नाही. तेव्हा तय्यार रहा !! आपण आता वानप्रस्थाश्रम स्विकारतो आहे. वानप्रस्थाश्रमाचा आजच्या काळात अर्थ समजून घ्यायचा म्हणजे असं की; कमळाच्या पानासारखं राहयचं - बरं झालं -

आज घरात कोणी नसल्यामुळे तुझ्याशी मोकळेपणाने बोलता आलं. बघ पटलं का माझं म्हणणं ?? असे म्हणून दोघेही देवघरात दिवा लावायला गेले. नमस्कार करतांना दिव्याच्या ज्योतीचा प्रकाश पुष्पानाईच्या चेहऱ्यावर पडला होता. या नव्या परिवर्तनासाठी आम्हाला बळ दे देवा !! अशी प्रार्थना दोघेही करु लागले !!

“ काडी काडी जमवून
बांधलेल्या घरट्यात
पिल्लांसवे आनंदाने
दोन पक्षी येती निवाऱ्यास
फुटताच पंख पिल्लांना
मारुनी उंच भरारी
स्वैर विहार करती गगनी
घरट्यात राहती पुन्हा
एकमेकांच्या आधाराने
दोनच ते पक्षी... दोनच ते पक्षी ”



सौ. निलीमा विनोद जोशी
ठाणे
मोबा. 98678 59039

